**"A Social Work Fortnight was organized in joint collaboration with the MASWE Social Work Association."**




**The "Social Work Fortnight" was organized to address the rising global and national unrest. The program emphasized that while the world faces international warfare, India is witnessing internal challenges such as communal, linguistic, and caste-based conflicts.**

**The organizers highlighted that issues like interfaith marriage disputes and ethnic violence are alarming for a civil society. To sensitize students and create a sense of social responsibility, this fortnight was dedicated to discussions on peace building, gender respect, and national integration.**

IQAC Co-ordinator
Smt. Panchfuladevi Patil Social Work College, Khadki, Akola

Smt. P.D. Patil Social Work College
College Code 225
Khadki, AKOLA

Principal,
Smt. Panchfuladevi Patil College of Social Work, Khadki, Akola (M.S.)




अवघाचि महाराष्ट्र नजरेत आमच्या | प्रश्न मांडणी करी सामान्य जनांच्या

# वैराग्यमूर्ती

आरसा समाज मनाचा, भावना दीन वंचित वाचक वर्गाच्या...!

मुख्य संपादक मयूर अशोकराव सवाईकर

मो.न.८८०५००६०५१

भारत सरकार द्वारा पंजीकृत

RNI No- MAHMAR/2021/80724

E-Edition

बुधवार | २७.०८.२०२५

मार्गदर्शक - नागेश उंबरकर

संपादक - सतिश सांबसकर

मुंबई, पुणे, नागपूर, अमरावती, अकोला, यवतमाळ, भंडारा, गोंदिया, जळगाव, वाशिम, औरंगाबाद, नांदेड, नाशिक, वर्धा, सोलापूर, परभणी, सांगली, बीड, बुलढाणा येथून प्रसिद्ध...


## समाजकार्य महाविद्यालयात समाजकार्य पंधरवडा निमित्त विविध कार्यक्रम संपन्न

वैराग्यमूर्ती न्यूज नेटवर्क

**अकोला (प्रतिनिधी)**: श्रीमती पंचफुलादेवी पाटील समाजकार्य महाविद्यालय, खडकी अकोला व 'मास्वे' समाजकार्य संघटना, महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने समाजकार्य पंधरवडा निमित्त दिनांक ०९ ऑगस्ट ते २३ ऑगस्ट २०२५ दरम्यान विविध कार्यक्रम संपन्न झाले. 'मास्वे' समाजकार्य संघटना, महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष तथा मागासवर्गीय आयोगाचे सदस्य डॉ अंबादास मोहिते सर यांच्या संकल्पनेतून सहकार्य, समानता व शांततेच्या जगाकडे या थीमच्या माध्यमातून हा पंधरवडा साजरा करण्यात आला. मागील वर्षापासून दरवर्षी दिनांक ९ ऑगस्ट ते २३ ऑगस्ट हा कालावधी "समाजकार्य पंधरवडा" राज्यात साजरा करण्याचे "मास्वे" ने ठरविले आहे. २०२४ मध्ये आम्ही "सर्वांचा आदर - महिलांचा सन्मान" ही थीम घेऊन सर्वांच्या सहकार्याने "समाजकार्य पंधरवड्याचे" यशस्वी आयोजन केले. आज जगभरात अनेक ठिकाणी देशा देशांमध्ये युद्ध सुरू आहे तर काही ठिकाणी देशांच्या सीमांवर प्रचंड तणाव तर काही भागात देशांतर्गत हिंसक संघर्ष सुरू आहे. भारततही विविध भागात वांशिक, भाषा, सीमा, धर्म, जात, आंतर - धर्मीय विवाह, गोरक्षण यावरून निर्माण होणाऱ्या दंगली, संघर्ष, हिंसा व तणाव निश्चितच चिंताजनक आहे. सांस्कृतिक विविधता हा मानवजातीचा वैभवशाली वारसा आहे, विविधतेतील एकता आपल्या देशाचे सौंदर्य आहे. आज मात्र हीच विविधता संघर्षाचे कारण बनते आहे. जागतिक तापमानवाढ, गरिबी, बेरोजगारी, आर्थिक असमानता, मानवी हक्कांची पायमल्ली, धर्मांधता, जातीयवाद, आतंकवाद, दहशतवाद अशा समस्यांशी सामना करण्याकरिता आणि देशाला एक सुजलाम - सुफलाम व समृद्ध राष्ट्र निर्मितीकरिता आज खऱ्या अर्थाने एकोप्याची, सहकार्याची, समन्वयाची, समावेशी दृष्टिकोनाची आणि शांततेच्या मार्गाची नितांत गरज आहे. या पार्श्वभूमीवर "समाजकार्य पंधरवड्यात" आम्ही पुढील विषयांवर महाविद्यालयात, क्षेत्रकार्य संस्थांमध्ये चर्चासत्र, कार्यशाळा, वक्तृत्व, निबंध व वादविवाद स्पर्धा, चित्रकला, छायाचित्र, पोस्टर्स व रील्स स्पर्धा आदींचे तसेच शांतता, शिक्षण व संविधानिक मूल्यांचा प्रसार करणारे उपक्रम, पर्यावरण पुरक उपक्रम, लिंगभाव समानता व महिला सबलीकरण आदी उपक्रम राबविले. तसेच क्रांती दिन, आंतरराष्ट्रीय आदिवासी दिवस, राष्ट्रीय पुस्तक प्रेमी दिवस, ग्रंथालय जनक रंगनाथन जन्मदिन, आंतरराष्ट्रीय युवा दिन, विश्व अवयव दान दिवस, स्वातंत्र्य दिवस, सद्भावना दिवस, सर्व विद्यार्थी व प्राध्यापकांच्या



सहकार्याने एक पेड माँ के नाम अंतर्गत वृक्षारोपण, हर घर तिरंगा अभियान, छत्रपती शिवाजी महाराज पुतळा पुजन व परिसर स्वच्छता अभियान, पुस्तक प्रदर्शनी, पुस्तक वाचन इ. कार्यक्रम आयोजित केले. या पंधरवड्याचा समारोप दिनांक २३ ऑगस्ट २०२५ रोजी वैराग्यमूर्ती संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजन करुन करण्यात आला. समारोपीय कार्यक्रमाला प्राचार्य डॉ केशव गोरे, प्रा डॉ कविता कावरे, प्रा डॉ बळीराम अवचार, डॉ संकेत काळे, ग्रंथपाल डॉ दिपाली देशमुख, प्रा डॉ प्रफुल पवार, प्रा नवनाथ बडे, प्रा मनोहर वागतकर, डॉ रोहित काळे, डॉ केतन वाकोडे, डॉ प्रेमसिंग जाधव, प्रा पांडुरंग पाचपुते, दै. सकाळचे यीन विभागीय अधिकारी प्रसाद गावंडे, डॉ सुगत मोहोड हे उपस्थित होते. संस्थेचे सन्माननीय सचिव डॉ सुरेशराव काळे व महाविद्यालय अध्यक्ष तथा समाजकार्य अभ्यास मंडळ सदस्य डॉ संकेत काळे यांच्या मार्गदर्शनात समाजकार्य पंधरवडा अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या कार्यक्रमात समाजकार्य अभ्यासक्रमातील सर्व विद्यार्थी, प्राध्यापक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी सहभागी झाले होते. समारोपीय कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा पांडुरंग पाचपुते, प्रास्ताविक प्राचार्य डॉ. केशव गोरे तर आभार प्रदर्शन ओम तारापुरे यांनी केले. राष्ट्रगीताने कार्यक्रमांची सांगता करण्यात आली

IQAC Co-ordinator
Smt. Panchfuladevi Patil Social Work College, Khadki, Akola

Smt. P.D. Patil Social Work College
College Code 225
Khadki, AKOLA

Principal,
Smt. Panchfuladevi Patil College of Social Work, Khadki, Akola (M.S.)